REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# जागतिकीकरण व मराठी लेखकांपुढील आव्हाने

**डॉ.शिवाजीराव मा.देशमुख**
मराठी विभा ा, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर.

**प्रस्तावना :-**

जागतिकीकरण आणि मराठी लेखकापुढील आव्हाने याविषयी लिहिणे म्हणावे तेवढे सोपे नाही.तरा आजपर्यंत तसा प्रयत्न अनेकांनी केला आहे. जागतिकीकरणाच्या बाजूने लिहिणारे जसे आग्रही असतात, त्याप्रमाणे यजागतिकीकरणाच्या विरोधात विचार करणारे अनेक आहेत. जागतिकीकरण या शब्दाने विश्वाला कवेत घेतले आहे.यामुळे जागतिकीकरणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अशी संभ्रमित अवस्था आज निर्माण झाली आहे. आपण जेवढे जास्त 'लोकल' तेवढे 'ग्लोबल' हा विचार मूळ धरु लागला आहे. हे शतक विज्ञान तंत्रज्ञानाचे, संगणक युगाचे, माहितीच्या स्फोटाचे, खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या ध्यासाचे आहे.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी सॅम पित्रोदा यांच्या नेतृत्वाखाली संगणीकरण आणि दूरसंपर्क क्रांतीची मुहूर्तमेढ रोवून देशाच्या नव्या वाटचालीची सुरुवात केली. माजी पंतप्रधान नरसिंहराव यांच्या सरकारने राजीव गांधींचे खुले आर्थिक धोरण स्वीकारले. सन. १९९१ मध्ये तेव्हाचे अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी भारतीय दारे जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरण यासाठी खुली केली. परकीय गुंतवणुकीस प्रोत्साहन अशा विविध मार्गाने देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न केला. या आर्थिक बदलाबरोबर पाश्चात्य जीवनमूल्ये ही इथे आली रुजली. आणि यांनी आकर्षक मोहमयी रुप धारण केले. समग्र मानवी जीवनाचा चेहरा मोहरा आज बदलत आहे. वेगाने होणारी तांत्रिक व यांत्रिक प्रगती यामुळे सभोवतालचा बदलत जाणारा समाज व वातावरण सांस्कतिक विचारामध्ये होत असलेला बदल, समाजासमोरील समस्यांचे विविध स्वरुप, प्रसारामाध्यंमे राज्यकर्ते आणि त्यांची धोरणे या आणि अशा अनेक प्रकारामुळे लेखकांसमोर आव्हाने निर्माण झालेली आहेत.

एकीकडे आम भारतीय या स्थित्यंतरांची गोड फळं चाखत असताना मात्र मरज्ञ्ठी लेखकांना अनेक आव्हांनांना सामोरे जावे लागणार आहे. ती आव्हाने केवळ मराठी लेखकांसमोर नाहीत तर ती मराठी संस्कृती, मराठी माणसं, मराठी अस्मिता, मराठी शिकवणारे अध्यापक आणि विद्यार्थि यांच्यासमोर आहेत. इंग्रजी अंधानुकरणाचे वेड, मराठीमध्ये दर्जेदार साहित्य निर्मिती न होणे, क्लिस्ट अशी समीक्षापध्दती, शासन व्यवहार, न्यायालये एकूण जीवनव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या, मराठी भाषेचे स्वरुप- वाचन संसकृतीची उदासीनता,मराठी भाषा प्रभत्वाचा अभाव, परकीय भाषांचे आक्रमण-आकर्षण, कला-संगीत यातील वाढती आव्हाने, असे मराठी भाषेच्या संवर्धनाच्या बाबतीत भवितव्याच्या बाबतीत वेगवेगळे प्रश्न व आव्हाने मराठी लेखकांच्या समोर उभी राहिली आहेत.

जागतिकीकरण आणि आर्थिक खुलेपणामुळे निर्माण झालेली जीवघेणी स्पर्धा मूल्यांची मोडतोड, बहुसंस्कृतीचा ऱ्हास, मानवी नात्यातील पडझड, व्यक्तीवादाच्या अतिरेकाने येऊ घातलेले एकाकीपण, तुटलेले सर्वव्यापी दहशतवाद, जागतिक मंदीचे सार्वत्रिक दुष्परिणाम वैंढता चंगळवाद सेलेब्रेशन संस्कतीत वाढ स्वार्थलोलुपता यामुळे कुटुंबे व समाजव्यवस्थेला हादरे बसू लागले. हे सारे पचविण्याची मानसिक सक्षमता नसल्यामुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. असे सांस्कृतीक अभिसरण होत असताना त्यांचे साद पडसाद मराठी साहित्यावर उमटणे साहजिकचः त्यातूनच मग जागतिकीकरणाच्या मर्यादित परिघात का होईना लेखन करण्याचे आव्हान मराठी लेखकासमोर आहे.



आजचा लेखक अशा वळणार उभा आहे. जेथे त्याचे वास्तव अमर्याद विस्तारले आहे. जगभराच्या घटितांनी त्याच्या मनोविश्वात प्रवेश केला आहे. तेव्हा आपल्या जीवीत अनुभवांमध्ये समकालीन वास्तवात इतिहासबध्द करुन त्याला वाड्मयीन व्यक्तिमत्व देणे त्यास आवश्यक झाले आहे. नवसाम्राज्यशाही अर्थकारणाने त्याचे केवळ राजकीय, आर्थिकच नव्हे तर मानसिक, सांस्कृतिक जग हादरुन सोडले आहे. यामुळे त्याची अस्वस्थता शिगेला पोहोचली आहे. त्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी तो प्रयत्न करु लागला, त्यातून मग

जागतिकीकरणाच्या परिणामाची मर्यादित परिघात का होईना मीमांसा करणारे लेखन करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर निर्माण झाले आहे. या एकूण परिस्थितीत त्यांच्या पायाखालची वाळू सरकू न देता, त्याला जर आपली पाळेमुळे घट्ट टिकवून ठेवता आली तरच, तो त्याच्या समोरच्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करु शकणार आहे.

उदारीकरण, खुल्या व्यापारी धोरणामुळे विज्ञान तंत्रज्ञान उद्योग व्यापार कृषी या सर्व क्षेत्रात जागतिकीकरणामुळे बदलं घडून आला आहे. त्याचा सर्व मावनी जीवनावर परिणाम झाला आहे. सर्व क्षेत्रातील विकासाची दारे खुले झालेली आहेत. या प्रगती बरोबरच काही दुष्परिणामानांही तोंड द्या‍ावे लागत आहे. त्याचा विचार करणे आगत्याचे आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यामांनी घडवून आणलेल्या क्रांतीनंतर माहिती तंत्रज्ञान प्रचंड वेगाने वाढत गेले आहे. गुगलच्या साह्याने व्हाईट हाऊसमध्ये कोण बसले आहे? त्यांचे कोणते नियोजन चालू आहे? याबद्दलची माहिती देणारे तंत्रज्ञान आज बाजारात आले आहे या नानाविध सुखवस्तुंचा आज उपभोग घेतला जात असला तरी माणूस मात्र माणसापासून दूर चालला आहे.माणसाने तंत्रज्ञानाच्या आहारी किती जायचं याला काही सीमा आहेत. याचा परिणाम विपरीत होत आहे. माणसांचा प्रत्यक्ष सहवास, त्यातून प्रत्यक्ष घडणारी भावनिक व मानसिक देवाणघेवाण मराठी लेखकांसमोर आहे. आजची तरूण पिढी अतिशय बुध्दीमान आहे.परंतु या स्मार्ट पिढीचे दुःख आणि वेदना या वेगळ्या आहेत. त्याही लेखनातून व्यक्त होणे अपेक्षित आहे.

'जागतिकीकरणात माझी कविता' या कवितेमध्ये उत्तम कांबळे लिहितात.

''वैश्विक खेडं, शोधण्याचा प्रयत्न करतेय कविता,
पण हे खेडंही साला, भाकरीतल्या चंद्रासारख्या,
ते असूनही दिसत नाही, आणि दिसत नसून असतं,
या अदृश्य खेड्यात जाण्यासाठी, धनवंताची,बुध्दीवंताची काय गर्दी !
संगणक,क्रेडिट कार्ड, पासपोर्ट फॉरेन करंसी एक्सपोर्ट, इंपोर्ट,
एटीम, ऑनलाईन सर्व्हिस, पासवर्ड, कोडवर्ड, माऊस,साइट,

मोबाईल, ई-मेल चॅटिंग आणि चिटिंगही पांदीची माती कपाळी ल्यालेल्या भणंग माणसाजवळ यांपैंकी काहीच नाहीय'' जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले पेच कवी आपल्या कवितेतून यशस्वीपणे पकडण्याचा प्रयत्न करतो. या नानाविध सुखवस्तूंचा आज उपभोग घेतला जात असला तरी माणसातील माणूस मात्र दूर गेला आहे. एकेकाळी चैनीच्या मानल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी माणसासाठी गरजेच्या बनल्या आहेत.या मिळविण्यासाठी माणूस कोणत्याही मार्गाचा अवलंब करु लागला आहे. त्यासाठी आपलं नैतिक अधःपतन झालं तरी हरकत नाही ही स्वार्थी मानसिकता समाजात निर्माण होत आहे या नैतिक ऱ्हासाला कारणे कोणती हे मराठी लेखकांच्या लेखणीतून व्यक्त होणे ही काळाची गरज आहे.

जागतिकीकरण म्हणजे जगातल्या वेगवेगळया मानवी संस्कतींनी एकमेकांशी संवाद करणं, त्यांनी एकमेकांना भेटणं, त्यांच्यात काही व्यवहार व्यापार होणं यामुळेच आलिकडे महानगरांची अनियंत्रित वाढ होत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास, दुषितीकरण, रोगराईचे सावट सांस्कतिक अतिक्रमणे, स्वयत्ततेचा ऱ्हास, चंगळवादी वृत्तीची वाढ या गोष्टी या अनुषंगाने होत राहाणार आहेत. या सर्व प्रगती व अवनितीची जाणीव प्रत्येक सामान्य माणसाला करुन देण्याचे महत्त्वाचे काम मराठी लेखकांच्या समोर आहे.

आज जागतिकीकरणामुळे जीवनव्यवहारात येत असलेली विलगता एवढी प्रचंड आहे की, त्यातून समाजातून संपूर्ण संवाद शक्यताच संकटात सापडण्याचा धोका अटळ दिसतो. जागतिकीकरणाच्या गोंडस नावाखाली भांडवलशाहीचा जो हैदोस जगभर सुरु आहे , त्याने प्रत्येक गोष्टींचे रुपांतर क्रय विक्रयक्षम वस्तूमात्र करण्याचा सपाटा लावला आहे. लेखक, कलाकार, किंवा वैज्ञानिकही याला अपवाद नाहीत. माध्यमांच्या गदारोळात आणि त्यांना वेठीस धरणाऱ्या थैलीशहांच्या पध्दतशीर हिकमतीमुळे सर्वत्र संवेदनशील माणसांचा जणू स्मृतिभ्रंश होत असून भ्रामक वास्तवात ती माणसे रात्रंदिवस वावरु लागली आहेत. माध्यंमांव्दारे त्याला उपलब्ध झालेले असंगत माहितीचे डोंगर त्याला सज्ञान करण्यापेक्षा भ्रमिष्ट करुन सोडत आहेत की काय, असे वाटायला लागले. यथार्थाचे आकलन त्याला या आभाळाएवढ्या माहितीपुंजातून अभावानेच घडते. उलट त्याचे इतिहासभान मात्र कमी होत आहे. हे आजच्या मराठी लेखकांसमोर मोठे आव्हान आहे. याचे कारण असे की नव्या काळातील शक्तीशाली प्रवाहांचे अंतरंग आधारभत अधिष्ठाने मानवी विश्वातील ज्वलंत प्रश्नांवरच्या त्यांच्या भूमिका आणि त्यातील वेगवेगळेपणा उलगडून दाखविण्याचे आव्हान मराठी साहित्यिकांनी गंभीरपणे स्वीकारले आहे. असे दिसत नाही.

जागतिकीकरणामुळे साहित्यप्रांतात शिरलेल्या बाजारीकरणामुळे भाषेचे जे कळाहिन सपाटीकरण घडून येत आहे. याची अनेक उदाहरणे सार्वजनिक ठिकाणी ऐकावयास मिळतात. हिंदी, इंग्रजी व मराठी या भाषेतील मिश्रस्वरुपात अनेक वाक्ये ऐकावयास मिळतात. सुनिल अवचार यांच्या वर्तमानाच्या कवितेत कवी अंतर्मनाची खळबळ असा व्यक्त करतो.

'मेंदूचे झाले आहे कॉम्पुटर
तत्त्वज्ञान झाले आहे युज ॲण्ड थ्रो
संस्कती झाली आहे रखेल'

अशा स्वरुपाचे आवश्यकतेनुसार मराठी भाषेत इतर परभाषेतील शब्द येतील. भाषेची शुध्दता आणि सौंदर्य हे मुद्दे गैरलागू ठरतील. असंख्य शब्द नव्याने मराठी भाषेत प्रवेश करतील, स्थिर होतील, मिसळूनही जातील. परभाषिक शब्दांचा एक प्रचेड लोंढा मराठी भाषेत प्रवेश करील. मराठी शुध्दतेचा आग्रह धरणारी प्रवृत्ती या लोंढ्याच्या किनाऱ्यावर राहील. जागतिकीकरणात भाषिक व्यवहारावरील आदेशैंत्मक नियमांचे बंधन कमी होत जाईल. अशा परिस्थितीत मूळ स्वरुप न बदलता आपले अस्तित्व टिकवून ठेवणे हे एक आव्हान मराठी लेखकांपुढे उभे आहे.

या देशात अनेक राजवट्या आल्या तरीही आपल्या सेंतोनी आपली भाषा, संस्कती आणि मूल्यव्यवस्था टिकविली बळकट केली. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत सुमारे चारशे वर्ष सतत चाललेल्या या जागरामुळेच, सारे प्रभाव पचवत आपली भाषा व संस्कृती टिकली. तुर्की, फारशी, अरबी, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत अशा सगळया भाषांचा प्रभाव पचवत त्यातील कैक शब्दांना मराठीच्या पोटात घेत मराठी भाषा आणखी समृध्द होत गेली. परकीय सांस्कतिक आक्रमणांना पचवून उभे राहाण्याचा आपले स्वत्व टिकवण्याचा हा देशी वारसा संतांनी आपल्याला दिला आहे आजच्या जागतिकीकरणात आपली भाषा मूल्यव्यवस्था धोक्यात आलेली आसताना या देशी वारसासाठी परंपरा पुढे चालविण्याचे आव्हान आज मराठी लेखकांपुढे आहे.

पूर्वी मराठी भाषेच्या इतिहासात संस्कृत विरुध्द मराठी, अरबी फारसी विरुध्द मराठी अशी आव्हाने निर्माण झाली होती. पण ती आपण पेलूनही दाखविली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या लेखकाने इंग्रजी भाषेचे आव्हान पेलूनही दाखविले. पण आत्ताचे इंग्रजी व हिंदी भाषेचे आव्हान फार वेगळे आहे. कारण पूर्वी ज्यावेळी अशी आव्हाने निर्माण झाली त्यावेळी एकूण मराठी समाज खंबीरपणे मराठी लेखकाच्या पाठीशी उभा होता. आज त्या स्वरुपाची खंबीरता दिसत नाही. मराठी लेखकांची चिंता मराठी लेखकांनाच भेडसावत आहे. इंग्रजी भाषेकडे धाव घेणारा वाचकवर्ग इंग्रजीच्या प्रेमाने नव्हे तर तिच्या उपयुक्ततेमुळे तिच्याकडे वळताना दिसतो आहे. या संदर्भात याशवंतराव चव्हाण यांनी असा विचार मांडला आहे. ‘‘ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा ज्ञानाची होऊ शकते.’’ जगातील सर्व ज्ञान मराठी भाषेत येत नाही. तोपर्यंत ती ज्ञानभाषा होणार नाही. अत्याधुनिक ज्ञान मराठीत आणून जागतिकीकरणात सांस्कृतिक अभिवृध्दी करावी लागणार आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत केंद्रस्थानी अर्थकारण आहे. तर साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आणि त्याचे जगणे आहे. जागतिकीकरणाचे स्वरुप आणि परिणाम यातून साहित्यनिर्मितीसाठी अनेक विषय मिळत आहेत. त्यातून एक वैभवशाली व कसदार साहित्याची परंपरा निर्माण होणे आवश्यक आहे.साहित्यकृतीचा कस केवळ भाषेच्या बेगडी फुलोऱ्यावर अवलंबून नसतो. समाजाच्या व्यक्तिमत्त्वाचे त्याच्या स्नायूचे पीळ किती रसरसितपणे तिच्यातून व्यक्त होतात, हे महत्त्वाचे असते. असे मानवी भवभवनांचे चित्रण रेखाटणारे साहित्य मराठीत निर्माण करणे सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे.

सर्जनशील साहित्य प्रकाशित होण्याचे प्रमाण, पूर्वी कधीच नव्हते एवढे आज वाढले आहे. परंतु आजच्या लेखकामध्ये चौफेर वाचन, सखोल चिंतन,सर्वस्पर्शी व्यासंग,रसडोळस वाड्.मयीन दृष्टिकोण, ठोस वाड्.मयीन भूमिका, निकोप साहित्यप्रेम आणि त्यांच्या जोडीला ठोस वक्चारिक अधिष्ठान अभावानेच आढळते. साहित्यनिर्मितीमध्ये अशी विविधता असूनही कलावंताची संवेदनशीलता, प्रगल्भ अभिरुची आणि निकोप रसिकता याची जोड देऊन वाचकांना नवे भान दिले पाहिजे. वाचकांना अंतर्मुख करणारे आणि वाचकांच्या ओंजळीत नव्याने काहीतरी टाकण्याचे व कलाकृतीचे अंतस्थ सामर्थ्याचे मनोज्ञ दर्शन घडविण्याचा प्रयत्न मराठी लेखकांना करावा लागेल. जेणेकरुन जीवनाला सुखर करणाऱ्या श्रेष्ठ मूल्यांचे पूजन व्हावे, शोषणमूक्त समाजव्यवस्थेचा ध्यास असेल तरच त्या लेखकाच्या कलाकृती प्रभावी व श्रेष्ठ ठरतील असे मनोमन वाटते.

जागतिकीकरणाच्या व्यवस्थेनं लेखक वर्गासमोर निर्माण झालेले प्रश्न, त्यांच्या लेखांचे सत्वहरण करण्यास कारणीभूत ठरत आहेत. वाढत्या माध्यमांचा प्रभाव, मासिके, साप्ताहिके, दिवाळी अंक, यांची वाढती संख्या शिवाय दूरदर्शनच्या वाहिन्यावरुन सुरु राहाणाऱ्या शेकडो वाहिन्या आणि इंटरनेटवरुन कवितांची होणारी भाषांतरे, जगभरच्या वाचकापर्यंत पोहोचली जात आहेत. यातून मागणी तसा पुरवठा याचे तंत्र वापरले जाते.त्याला मानधन मिळत असेलही,पण साहित्याचे सत्त्व जपणे मात्र शक्य होत नाही. परिणामी साहित्याची निर्मिती ठोकळेबाज होत राहाते. त्याला बाजारु प्रतिष्ठा व प्रसिध्दी प्राप्त झाली आहे. प्रतिभेची किंमत देऊनही त्यांनी ती मिळवलेली असते यातूनच पुढे सवंग सन्मानाचा, पुरस्काराचा प्रतिष्ठेचा मोह अनावर होतो. लेखकाला जेव्हा त्याच्या लेखनापेक्षा जास्त महत्त्व मिळू लागते, तेव्हा त्याच्यातील लेखकाचा मृत्यू होणे अटळ असते. पुरस्काराने नेमड्डे हेच होते. लेखक जेवढा आत्मलुब्ध, आत्मसंतुष्ट, लैंकिकलंपट असेल तेवढा त्याचा मृत्यु लवकर ओढावतो. लेखकाने अराजकीय व्हावे व्यवस्थेचे त्याच्या साहित्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे समर्थन घडावे. बैंध्दिकतेशी फारकत घेऊन उथळ, चतुर व खुसखुशीत असे लेखन होता कामा नये. शिवाय तर्क विश्लेषण किंवा मूलगामी चिकित्सा करण्याऐवजी भाषणसंस्कृतीवर भर देऊन संमेलनाची व्यासपीठे गाजविण्यातच धन्यता मानतात. लेखक या बाबीपासून दूर राहिला पाहिजे असे वाटते.

महाराष्ट्रात अमराठी भाषिकांप्रमाणे जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर जाणवण्याइतके मोठे आहे. धंद्यामुळे आणि जागतिकीकरणामुळे हे प्रमाण गेल्या काही वर्षात सतत वाढत आहे. आपली मातृभाषा मराठी असल्यामुळे आपल्याला ती सहज सोपी वाटत असली तरी अमराठी भाषिकांच्या दृष्टीने ती फार कठीण व गुंतागुंतीची आहे. अशा लोकांसाठी मराठी भाषेची ओळख व्हावी, मराठी भाषेतील शक्तिस्थाने आणि सौदर्यस्थळे याचा परिचय होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी अनुवादित भाषांतरित व रुपांतरित

मराठी साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे. अमराठी तरुण पिढीला आपल्या भाषेबरोबर सारा महाराष्ट्र कळावा यासाठी अशा अनुवादाची योजना सर्वप्रथम केली पाहिजे. भाषेच्या संकुचित सीमा ओलांडल्याशिवाय साहित्यातील विशाल मानवतेचा आत्मस्पर्श होऊ शङ्क त नाही. तेव्हा मराठी लेखकांनी या क्षेत्राचा गंभीरपणे विचार करावा अशी वेळ आज आली आहे.

भाषांतरे परिभाषा निर्मितीसाठी शब्दकोश निर्माण करणे, भाषेच्या प्रमाणित स्वरुपाच्या आकलनासाठी व्याकरण, लोकसाहित्य, जाहिरातकला, अनुवाद संगणकसारख्या साधनांचा उपयोग प्रसारमाध्यमे, पेनड्राईव्ह,मायक्रोफिल्म,पेजरव्दारे संदेशवहन, ई-मेल, एस.एम.एस. या क्षेत्रात लेखकाच्या कर्तृत्वाला व कल्पनाशक्तीला भरपूर वाव आहे. नवनवीन विकसीत होत जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा मराठी भाषेच्या प्रगतीसाठी उपयोग होणाऱ्या दृष्टीने लेखकाने सदैव सतर्क राहणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणामुळे माणसाला जात,धर्म,पंथ,भाषा,प्रांत व देश या मर्यादित कक्षांमधून बाहेर काढता येईल तसेच जगातील लोकांना त्यांच्या संस्कृतीच्या माध्यमातून आपल्या लेखनातून समजावून घेणे शक्य आहे. परस्परांच्या साहित्यसंस्कतीतील चांगुलपणाची व मूल्यात्मकतेची देवाण-घेवाण ओळखून परस्परांच्या साहित्य संस्कतीतील व वर्तनातील उणिवा भरुन काढणेही आवश्यक आहे. जगातील सर्वच माणसांच्या मूलभूत संवेदना,भाव-भावना इच्छा-आकांशा व सुःख-दुखाच्या कल्पना सारख्याच आहेत. त्यांची जाणिव करुन दिल्यास विश्वकुटुंबाच्या उभारणीस मदत होईल.

लेखकापुढे जागतिकीकरणामध्ये सर्वात मोठे आवाहन आजच्या आर्थिक,सामाजिक परिस्थितीचे आणि त्यामुळे हवालदिल झालेल्या जनजीवनाचे आहे. आज अनेक क्षेत्रात गरुडझेप घेत असलेल्या आपल्या देशात ऐंशी टक्के जनतेच्या पायाभत गरजांची परिपर्ती होताना दिसत नाही. मध्यमवर्ग तरी १९९० च्या तुलनेत बऱ्यापैकी जीवन जगत असला तरी एकंदर जीवनाची पातळी घसरत चाललेली आहे. निरर्थक गरजांची निर्मिती करण्यामध्ये उत्पैदकांमध्ये स्पर्धा लागलेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या येथील सामान्यांच्या जीवनाशी क्रुर चेष्टा करीत आहेत. एक सभ्यता संपून तिच्या जागी दुसरी अमानुष सभ्यता उभा राहात आहे. लोकशाही मूल्यांशी काही देण घेण नसलेली अमेरिकन संस्कृतीच्या मोहात पूर्ण अडकलेली ही कॉर्पोरेट पिढी आज पुढे येत आहे. या पिढीला समाजातील जीवघेणी गरीबी ,कुपोषण,उपासमार, बेरोजगारी,निरक्षरता आरोग्य या सामान्यांच्या प्रश्नांशी काहीही सोयरसतक नाही. या ज्वलंत प्रश्नसवर काही प्रमाणात लेखन होत आहे व पुढे निर्माण होणे काळाची गरज आहे. कारण पाश्चात्य संकल्पना आणि वर्तनपध्दती अनेकांनी मनोमन स्वीकारलेली आहे.

जागतिकीकरणात एक क्षेत्र मात्र पाश्चात्यांच्या प्रभावापासून मूक्त राहिले आहे. ते म्हणजे अध्यैत्म आणि भक्तिमार्ग या क्षेत्रात संतसाहित्याने पुरेशी शब्दसंपदा निर्माण केलेली आहे. या क्षेत्रात परकीय भाषांचा प्रभाव पडण्याची शक्यता कमी प्रमाणात आहे. अर्थात याही क्षेत्रात पंचतारांकित अध्यात्म गुरु आहेतच. क्ष्यांची भाषा इंग्रजीच आहे. जे कृष्णमर्ती आणि त्यांचे अनुयायी इंग्रजींचा वापर करतात, मात्र असे लोक कमी आहेत. बहुसंख्य आध्यामिक लेखन करणाऱ्या आणि वारकरी सांप्रदायावर अभ्यास असणाऱ्यांना येथे आपल्या प्रतिभेचा अविष्कार दाखविता येईल.

### निष्कर्ष -

जागतिकीकरण आणि मराठी लेखकांपुढील आव्हाने या संदर्भात काही प्रश्न व निरीक्षणे नोंदविता येतील. भैतिक सुविधांच्या गदारोळात स्वार झालेल्या आजच्या लेखकांना आपले सत्त्व आणि प्राध्यान्यक्रम सांभाळण्याचे भान आहे का? लोकशाहीला पोषक ठरणाऱ्या धर्मनिरपेक्ष शक्तीची वाढ होणाऱ्या लेखनावर भर देणारे लेखन किती निर्माण होत आहे.? स्वतः सुखासीन जीवन जगताना समाजव्यवस्थेबद्दलचे औदासिन्य त्यांच्या लेखनातून चित्रित होईल का? संपूर्ण समाजाने प्रतिकार केल्यास दुःस्थितीचे चित्र पालटू शके ल, असे पूर्वी वाटायचे आता तसे अजिबात वाटत नाही. याचे कारण दुभंग आणि आत्मकेंद्री व्यक्तिवाद हेच आहे काय? असे असंख्य प्रश्न मनात निर्माण होतात. तरीही आजचे लेखन वाचकांना प्रभावित किंवा मोहित करत आहे.पण सांगण्यासारखे त्यांच्या जवळ किती आहे? लेखकाची संवेदनेची पाळेमुळे प्रत्यक्षात किती सशक्त आहेत हेही महत्त्वाचे आहे जागतिकीकरणामध्ये लेखकांना ही बदलती आव्हाने कितपत पेलता येतील याची शंकाच वाटते. याचे कारण मराठी लेखकांचे अनुभवविश्व फार तोकडे आहे. बाह्य विश्वाचे आंतरिकपण करण्याऐवजी आपल्या मनातली कल्पित वास्तव तो अधोरेखित करत असतो. स्वतःची क्षमता पणाला लावून लिहिण्याऐवजी कंपू करुन लिहिण्याकडे कल दिसतो, नव्या उमेदीच्या लेखकाने जागतिक आव्हानांना सर्व ताकदीनिशी भिडण्याऐवजी केवळ प्रतिक्रियात्मक लिहिण्यावर समाधान मानताना दिसतात. जे घडलेले, अनुभवलेले आहे, त्याच्या कार्यकारणाचा शोध घेण्यापेक्षा त्याचे दृश्य परिणाम शब्दबध्द करण्यावर भर दिसतो. जागतिक पातळीवर प्रभाव निर्माण करण्यापेक्षा कालसापेक्ष दहशतीपुढे मान झुकविणाऱ्यांची संख्या अधिक दिसते. शुद्र अस्मितांच्या फसव्या प्रणालींच्या उथळ रंजनांच्या व व्यापारी मूल्यांच्या विळख्यातून मराठी लेखन मूक्त करण्याचे व राखण्याचे आव्हान मोठे आहे. या लेखाचा समारोप मंगेश पाडगावकरांच्या कवितेने असा करता येईल,

कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी  
गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी  
हे धर्म, देवळे, ही धुंडून सर्व आलो  
भिंतीपल्याड त्यांच्या माणूस शोधतो मी

संदर्भ -


१- जागतिकीकरण मराठी कविता - उत्तम कांबळे
२- साहित्य काही देशी काही विदेशी - डॉ. आनंद पाटील
३- मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप - संपादक गो.मा. पवार
४- मराठी भाषेची स्थिती आणि गती —डॉ. मधुकर मोकाशी
५- जागतिकीकरण साहित्य आणि संस्कती - भालचंद्र नेमाडे